**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठात 'अभिनव पदार्थ व साधने' यावर २४ जून रोजी द्विदिवसीय परिसंवादाचे आयोजन

अमरावती –

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा भौतिकशास्त्र विभाग आणि श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक २४ व २५ जून, २०१९ रोजी 'अभिनव पदार्थ व साधने' या विषयावर द्विदिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. २४ जून, २०१९ रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठ दृकश्राव्य सभागृहात उद्‍घाटन कार्यक्रम संपन्न होणार असून अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर भूषवतील. प्रमुख अतिथी म्हणून सी.एस.आय.आर., नवी दिल्लीचे संचालक तथा डी.एस.आय.आर., नवी दिल्लीचे सचिव डॉ. शेखर मांडे उपस्थित राहतील. उद्‍घाटन कार्यक्रमाला श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे अध्यक्ष श्री हर्षवर्धन देशमुख, एम.एस. बडोदा विद्यापीठाचे प्राध्यापक तथा ल्युमिनसेन्स सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ.के.व्ही.आर. मुर्थी व सायन्टीफिक प्रोग्राम कमिटीचे अध्यक्ष डॉ.एस.व्ही. मोहरील यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

प्रथम सत्रात बीजभाषण डॉ. शेखर मांडे व डॉ.एस.व्ही. मोहरील करणार असून अध्यक्षस्थानी नागपूर विद्यापीठाचे माजी भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ.एस. राजगोपालन राहतील. त्यानंतरच्या सत्रात एस.व्ही. विद्यापीठ, तिरुपतीचे डॉ.सी.के. जयशंकर, पुसान राष्ट्रीय विद्यापीठ बुसन, कोरीयाचे डॉ. राजाराम माने, बार्क, मुंबईचे डॉ.डी.के. कौल, संबलपूर विद्यापीठ, ओरीसाचे डॉ.डी.पी. ओझा, दिल्लीचे डॉ.पी.डी. साहारे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे डॉ.एस.बी. सदाले, नागपूर विद्यापीठाचे डॉ.एस.जे. ढोबळे, व्ही.एन.आय.टी. नागपूरचे डॉ.व्ही.के. देशपांडे, वारंगलचे डॉ. दिवी हरनाथ, मुंबईचे डॉ.मो. अतिक रहेमान, भाभा अनुसंधानचे डॉ. भुषण धाबेकर, पुणे विद्यापीठाचे डॉ. नंदु चौरे, डॉ. अरुण बनपूरकर, बंगलोरचे डॉ.के.आर. नागभूषण यांचेसह इतर वरीष्ठ संशोधकांचे अभिनव पदार्थ व त्याचा उपयोग आणि नाविन्यपूर्णता विशेषतः भारताचा शाश्वत विकास होण्याच्या दृष्टीने मोलाचे संशोधनपर मार्गदर्शन होईल.

दिनांक २५ जून, २०१९ रोजी सायं. ५.०० वाजता श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयातील सर सी.व्ही. रमण सभागृहात समारोपीय कार्यक्रम संपन्न होणार आहे. समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे अध्यक्ष श्री हर्षवर्धन देशमुख भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर उपस्थित राहतील. समारोपीय कार्यक्रमाला माजी कुलगुरू डॉ.जी.व्ही. पाटील, डॉ.एस.टी. देशमुख, डॉ.एम.के. खेडकर, डी.वाय. पाटील विद्यापीठ, पुणे व कोल्हापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.एस.एच. पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एफ.सी. रघुवंशी यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

तरी परिसंवाद कार्यक्रमाला संशोधक विद्यार्थी, पदव्युत्तर विद्यार्थी, शिक्षक यांनी नामांकन करुन आपला परिसंवादातील सहभागाचा प्रवेश दि. २३ जून, २०१९ पर्यंत निश्चित करावा व जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचे प्राचार्य डॉ.व्ही.जी. ठाकरे, विद्यापीठ भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ.एस.के. ओमनवार, संयोजक डॉ.व्ही.बी. भटकर, डॉ.एस.ए. वाघुळे व सचिव डॉ. पी.ए. नागपूरे यांनी केले आहे. विदर्भातील विद्यापीठांचे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता सुद्धा या परिसंवादाला उपस्थित राहणार आहेत.

---

प्रति,  **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी  दि. २०/०६/२०१९.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी